**आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे**
**निवासी व्यक्तींसाठी सुविधेचे उदारीकरण**
**मे २१, २००३**

अधिक उदारीकरणामधील पुढचे पाऊल म्हणून, विदेशी मुद्रा अधिनियमानुसार, अधिकृत विक्रेता किंवा विदेशी बँकेकडे विदेशी चलन खाते ठेवणाऱ्या निवासी व्यक्ती, विदेशी बँका व इतर नामांकित संस्थाकडून आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डे (आय.सी.सी) घेण्याची मुभा आहे. या कार्डावर भारतात किंवा परदेशात झालेला खर्च, कार्डधारकाच्या विदेशी चलन खात्यातून किंवा कार्डधारकाच्या भारतातील चालू वा बचत खात्यातून भरता येईल. असा भरणा फक्त कार्ड देणाऱ्या विदेशी संस्थेतच करता येईल, त्रयस्थ व्यक्तीला / संस्थेला देता येणार नाही. या शिवाय हे ही स्पष्ट करण्यात येते की क्रेडिट कार्डाची मर्यादा क्रेडिट कार्ड देणाऱ्या बँकेने ठवरल्या प्रमाणेच राहील. भारतीय रिझर्व्ह बँकेने या सुविधेच्या देयकांवर कोणतीही वित्तीय मर्यादा (असल्यास) घातलेली नाही.
याउपर स्पष्ट करण्यात येते की क्रेडिट कार्डे वापरतांना कार्डधारकांवर निषिद्ध वस्तू / सेवांची खरेदी उदा. लॉटरीची तिकिटे, निर्बांधित वा निषिद्ध पुस्तके, स्वीपस्टेक (जुगार) चा सहभाग, कॉलबॅक सेवा यांवरील सध्याचे निर्बंध लागू असतील.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज २००२-२००३/११८१**